This Question paper shared by Pratik Patil from Kolhapur District. Thanks Pratik.

Contact us: @SahajAdhyayan

Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE.

# पूर्व परीक्षा क्र. १

इयत्ता - १२ वी विज्ञान | विषय - मराठी | गुण - ८०

दिनांक - १८-०१-२०२१ | कृतिपत्रिका | वेळ - ३ तास

## विभाग १ - गद्य

कृती १ अ. खालील उता-याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा. ०८

१. लेखक शिवराज गोर्ले यांनी सांगितलेल्या आनंदाच्या गमती ०२

[ ] [ ]

२. विधाने पूर्ण करा. ०२

य) आनंदाला आकर्षित करणारा - [ ]

र) शरीर आणि मन यांना जोडणारा सेतू - [ ]

आनंदाची गंमत अशी आहे, की तुम्ही शोधू लागलात, की तो दडून वसतो, पकडू गेलात, की हातातून निसटतो. आनंदासाठी जितका आटापिटा कराल, तितका तो हुलकावण्या देतो. जितका सहजपणे घ्याल तितका आनंद सहज प्राप्त होतो. आनंद असतोच. तो अनुभवता मात्र यावा लागतो. आनंदाच्या बाबतीत कळसा काखेत असूनही आपण गावाला वळसा घालीत असतो. आनंद आपण बाहेर शोधत असतो आणि तो मात्र आत असतो. आनंद आपल्या मनातच असतो. आनंदाच्या झ-याचा उगम आपल्या अंतरंगातच असतो. हे खरं आहे, की आनंद सर्वत्र असतो; पण अंतरंगात आनंद असेल, तरच तो अनुभवता येतो. आनंदाचं नातं जुळतं, ते फक्त आनंदाशी. आनंदाला आकर्षित करतो, तो फक्त आनंदच. आनंदाला प्रसवतो, तोही आनंदच. आनंदाचं भान जागृत ठेवणं हेच आनंदाचं रहस्य आहे. असंख्य, अगणित पातळ्यांवर आनंद अनुभवता येतो. आपल्या आयुष्यासोबत ज्याचं अस्तित्व असतं, तो म्हणजे अस्तित्वाचा आनंद. आपलं अस्तित्व आपण नेहमीच गृहीत धरून चालतो आणि अस्तित्वाच्या आनंदाला मुकतो. आपल्या अस्तित्वाची साक्ष देत असतो तो आपला श्वास. आपल्या श्वासाचंही आपल्याला भान नसतं. खरंतर श्वास हा शरीर आणि मन यांना जोडणारा सेतू असतो. हा सेतू आपण जाणीवपूर्वक वापरत नाही. पोटातून खोलवर श्वास घेणं केवळ आरोग्यासाठी चांगल असतं, असं नव्हे, तर त्यामुळे मनही शांत होतं. मुख्य म्हणजे श्वासाचं बोट धरून मनापर्यंत पोहोचता येतं, मनाशी नातं जोडता येतं. पण आपण श्वासाकडे लक्षच देत नाही. आयुष्यातला एकेक क्षण येतो आणि जातो. आपण क्षणांकडे लक्ष देत नाही. एकेक दिवस उजाडतो, मावळतो. आपण दिवसाकडे पाहात नाही. सूर्योदय, सूर्यास्त होतो, तोही आपण नीट पाहात नाही. तो दिसतो, तेव्हा आपल्याला दृष्टी आहे, हेही आपण गृहीत धरतो. जे जे आनंद देणारं आहे, ते गृहीतच धरून चालल्यामुळे आपल्याला ना सृष्टीचं कौतुक वाटतं, ना दृष्टीचं. आपल्या श्वासाचं, आपल्या अस्तित्वाचं, आपल्या अस्तित्वाच्या आनंदाचं भान हवं.

३. स्वमत - अभिव्यक्ती ०४

'प्रत्येक माणसाला आपल्या अस्तित्वाचे भान असणे गरजेचे आहे' तुमचे मत लिहा.

किंवा

'आनंदी आनंद गडे, जिकडे तिकडे चोहीकडे' या विधानाचा तुम्हास कळलेला अर्थ स्पष्ट करा.

8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi

Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE. Contact us: @SahajAdhyayan



आ) खालील उता-याच्या आधारे सूचनेचेनुसार कृती करा. ०८

१) य) लेखकांनी दुख-या दाताला दिलेली उपमा : ☐ ०२

र) दाताच्या ठणक्यामुळे लेखकांना दिसू लागते ते : ☐ ०२

२) दात दुखताना लेखकाला होणारे साक्षात्कार → ☐ → ☐

दात दुखायला लागला, की तो मुळापासून दुखू लागतो. किंबहुना दाताला मूळ असते हे फक्त तो दुखायला लागला म्हणजेच कळते. माझा दात जेव्हा दुखायला लागला तेव्हा तर माझी खात्रीच झाली, की आपण आरोग्यशास्त्राच्या पुस्तकात पाहिलेले दाताचे चित्र आणि प्रत्यक्ष आपले दात यांत फार फरक असला पाहिजे. आपल्या दाताला मूळ नसून झाडासारख्या मुळया असल्या पाहिजेत आणि त्या हिरडयांत सर्वत्र पसरल्या असल्या पाहिजेत. नाहीतर सगळे दात दुखत असल्याचा भास मला का व्हावा ? प्रत्येक दाताला हात लावून पाहिल्यानंतर ज्या दाताने शंख करायला लावला, तो दुखरा दात याची खात्री झाली. दुख-या दाताला लहानसा स्पर्शसुद्धा खपत नाही! बरे, हे दुखणे तरी साधे, सरळअसावे ? तेही नाही. एखादया कवीच्या मनातील जिप्सीसारखा एखादा लाकूडतोडया माझ्या दाताच्या मुळाशी खोल वसलेला असतो आणि तो एकामागून एक घाव घालीत असतो. असे म्हणतात, की दिवसा सभ्य दिसणारी माणसे रात्री आपल्या ख-या रूपात फिरतात. दात हा अवयवही अशाच माणसांसारखा असावा. नाहीतर दिवसा अधूनमधून पण सभ्यपणे दुखणारा दात रात्री राक्षसासारखा अक्राळविक्राळ का होतो ? दांत आणि चोरांत साम्य असे ते याच बाबतीत. दोघेही रात्री गडबड करतात. दात दुखण्याने मी आध्यात्मिक तत्त्वचिंतनही करतो. दात दुखतो तेव्हा मला साक्षात्कार होतो, की दात हेच सत्य आहे. जग मिथ्या आहे. त्या क्षणी संसार असार वाटतो. नेहमी हवेहवेसे वाटणारे शेंगदाणे दगडासारखे वेचव लागतात. वायको व मुले हा केवळ भास आहे असे वाटते. समोरून येणारी एखादी सुंदरी डोळयांना जाणवतच नाही आणि दाताचा ठणका मला व्रम्हांड दाखवू लागतो. रात्रभर माझ्या व्रम्हांडाच्या दहा-वीस फे-या तरी सहज होतात आणि पहाटे व्रम्हांड मिथ्या असून दातच सत्य आहे याची पुन्हा एकदा जाणीव होते.

३) लेखक वसंत सवनीस यांनी दुख-या दाताची तुलना अकाळविकाळ राक्षसाशी केलेली आहे, यावावत तुमचे मत लिहा. ०४

किंवा

३) प्रस्तुत उता-याच्या आधारे लेखकाने केलेल्या दातदुखीच्या वर्णनातील विनोद स्पष्ट करा.

इ) १) खालील उता-याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा. ०४

य) आकृतिबंध पूर्ण करा. ०१

रवींद्रनाथ टागोरांचे विशेष → ☐ → ☐

र) चौकट पूर्ण करा. ०१

रवींद्रनाथांच्या मते, मानवी जीवनाच्या वेलीवर उमलणारी फुले - ☐

जगप्रसिद्ध कवी, तत्त्वज्ञ आणि शिक्षणतज्ज्ञ गुरूदेव रवींद्रनाथ टागोर यांनी 'शांतिनिकेतन' संस्थेची स्थापना केली. 'शांतिनिकेतन' ही केवळ एक शैक्षणिक संस्था नसून ती एक स्वावलंबन शिकवणारी परिपूर्ण जीवनशैली आहे. या संस्थेद्वारे रवींद्रनाथांनी प्राचीन भारतीय गुरूकुल पद्धतीचे पुनरूज्जीवन केले. गुरू-शिष्यांच्या संबंधावर चिंतन करणा-या रवींद्रनाथांनी नव्या पिढीतील मुलांच्या समस्या जाणल्या होत्या. शिक्षण ही परस्पर आदान-प्रदानाची प्रकिया आहे, ती सन्मानपूर्वक घडावी, समाजातील प्रत्येक घटकांपर्यंत ज्ञानगंगा वाहावी, मुलांना कारकुनी शिक्षणापेक्षा जीवनलक्ष्यी शिक्षण मिळावे याकडे त्यांचा विशेष कल होता.

औपचारिक शिक्षणामुळे माणुसही अति औपचारिक वनतो, कृत्रीम होतो, निखळपणा गमावून वसतो. शाळारूपी कोंडवाडयांतून वेळापत्रकानुसार चालणारा ठरावीक अभ्यासकम मुलांना 'माणूस' म्हणून घडवू शकत नाही, असे त्यांना वाटे. ते म्हणत, 'वालक' म्हणजे मानवी जीवनाच्या वेलीवर उमलणारी फुलंच! त्यांना जितका मोकळेपणा व स्वातंत्र्य मिळेल तितकी ती प्रफुल्लित व टवटवीत वनतील. पालकांनी किंवा शिक्षकांनी मुलांना ज्ञान भरवण्यापेक्षा ते मुलांनीच त्यांच्या धडपडीतून मिळवणं फार आवश्यक आहे.

'शांतिनिकेतन' ही रवींद्रनाथांची शिक्षणविषयक संकल्पनांची प्रयोगभूमी होती. त्यांची शिक्षणविषयक भूमिका व शिक्षणपद्धती ही आजही तितकीच गरजेची आहे. उदयाचा सुजाण, सर्जनशील व्यक्ती घडवण्यास उपयुक्त आहे.

२. खालील कृती करा ०२

य) प्राचीन भारतीय गुरूकुल पद्धतीचे पुनरूज्जीवन करणारी संस्था ...........

र) वालक म्हणजे ...........

8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi

This Question paper shared by Pratik Patil from Kolhapur District. Thanks Pratik.

Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE.     Contact us: @SahajAdhyayan



## विभाग २ - पदय

कृती २ अ) खालील कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा. ०८

१) कवितेतील स्त्री करीत असलेली विविध कामे → ०२

२) चौकटी पूर्ण करा ०२

य) घरादाराला बांधलेले - ☐

र) काडया काडयांनी सांधलेला - ☐

सरी-वाफ्यात, कांदं लावते
बाई लावते
नाही कांदं ग, जीव लावते
बाई लावते
काळ्या आईला, हिरवं गोंदते
बाई गोंदते
रोज मातीत, मी ग नांदते
बाई नांदते ||

फुलं सोन्याची, झेंडू तोडते
बाई तोडते
नाही फुलं ग, देह तोडते
बाई तोडते
घरादाराला, तोरण बांधते
बाई बांधते
रोज मातीत, मी ग नांदते
बाई नांदते

ऊस लावते, वेण दाबते
बाई दाबते
नाही वेणं ग, मन दाबते
बाई दाबते
कांडया-कांडयांनी, संसार सांधते
बाई सांधते
रोज मातीत, मी नांदते
बाई नांदते ||

उन्हातान्हात, रोज मरते
बाई मरते
हिरवी होऊन, मागं उरते
बाई उरते
खोल विहिरीचं, पाणी शेंदते
बाई शेंदते
रोज मातीत, मी ग नांदते
बाई नांदते

अभिव्यक्ती ०४

३) तुमच्या परिसरातील कष्टकरी स्त्रियांचे कुटुंबाच्या उदरनिर्वाहातील योगदान स्पष्ट करा.

आ) खालील ओळींचा अर्थ लिहा. ०४

हया विंचवाला उतारा | तमोगुण मागे सारा |
सत्त्वगुण लावा अंगारा | विंचू इंगळी उतरे झरझरा ||

इ) कृती करा (कोणतीही १) ०४

काव्यसौंदर्य

कोण जाणे कोठुनी हया सावल्या आल्या पुढे;
मी असा की लागती हया सावल्यांच्याही झळा ||

या ओळींमधील भावसौंदर्य स्पष्ट करा.

किंवा

रसग्रहण

'रडू नकोस खुळे उठ ! आणि डोळयातले हे आसू
सोडून दे शेजारच्या तळयात
नि घेऊन ये हातात
नुकतीच उमललेली शुभ्र कमळांची प्रसन्न फुले'

या ओळींचे रसग्रहण करा.

8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi

## विभाग ३ - साहित्यप्रकार - कथा

कृती ३. खालील उता-याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा. ०४

अ.१) एका वाक्यात उत्तरे लिहा.

य) कथानक साकार होण्यासाठी आवश्यक असणारा घटक ः- ०१

र) कथेला वेगळी उंची प्राप्त करून देणारा घटक ः- ०१

वातावरण निर्मिती ः कथेला स्थळ-काळावरोबरच सामाजिक, भौगोलिक, सांस्कृतिक, राजकीय इत्यादींनी युक्त वातावरण असते. या वातावरणाचा वाचकांवर परिणाम होऊन तो कथानकाशी एकरूप होतो. वातावरणाचा पट जितका सघन तितकी कथा सकस होते.

नाट्यमयता / संघर्ष ः कथेत चांगल्या-वाईटाचा संघर्ष असतो. त्यातूनच नाट्यमयता निर्माण होते. या संघर्षातूनच कथा उत्कर्षबिंदूपर्यंत पोहोचते. कथेत प्रत्येक वेळी संघर्ष किंवा नाट्य हे वाईट घटनांचेच असते असे नाही, तर आनंद आणि सुखात्मिक घटनांतूनही नाट्यमयता निमार्ण होते. कथेच्या शेवटी कथेतील अनुभवांचा, घटनांचा उत्कर्षबिंदू नाट्यपूर्णरीतीने साधता येतो पण तरीही कथानकाच्या ओघात स्वाभाविकपणे झालेला शेवट वाचकाला आकर्षित करतो.

संवाद ः कथेतील संवाद हे चटपटीत, आकर्षक, वाचकाच्या भावविश्वाला स्पर्श करणारे आणि कथानकाला प्रवाही ठेवणारे असतात. पात्रांच्या स्वभावधर्मानुसार व परिस्थितीजन्य घटकांनुसार संवाद लिहले जातात, या संवादात लय व आंतरिक संगती महत्वाची असते. संवादातून रसनिर्मिती आणि रसपरिपोष होत असतो. अर्थपूर्ण संवाद कथेला वेगळी उंची प्राप्त करून देतात.

भाषाशैली ः कथानक भाषेच्या मदतीने साकार होत असते. कथेतील पात्रांच्या स्वभाववैशिष्ट्यांनुसार व कथेतील वातावरणानुसार भाषेची योजना केली जाते. कथाकार, त्याचा दृष्टिकोन, त्याची अनुभव घेण्याची पद्धत यांनुसार कथेचे भाषारूप आणि शैलीविशेष निश्चित होत जातात. कथा लिहिताना साधारणतः प्रमाण भाषा आणि वोली भाषा यांची सरमिसळ केली जाते. तसेच कथा पूर्णपणे वोलीभाषेतही लिहिली जाते.

२) कथेचे संवाद व भाषाशैली हे घटक स्पष्ट करा. ०२

आ) खालील पैकी कोणत्याही दोन कृती सोडवा ०६

य) अनुचे 'समाज' समजून घेण्याचे प्रयत्न स्पष्ट करा.

र) भिडे दाम्पत्याची सामाजिक वांधिलकी थोडक्यात वर्णन करा.

ल) वोर्डिंग मधील विद्यार्थ्यांचे वापू गुरूजींवद्दल असलेले प्रेम तुमच्या शव्दांत लिहा.

व) 'पाखरानं पयले पखं पारखावं आन मंग उळावं' असे वापू गुरूजी म्हणत ते स्पष्ट करा.

## विभाग ४ - उपयोजित मराठी

कृती ४. अ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा. ०४

१) मुलाखत म्हणजे पूर्व नियोजित संवाद हे स्पष्ट करा.

२) मुलाखत घेताना घ्यावयाची काळजी थोडक्यात लिहा.

३) माहितीपत्रकाची उपयुक्तता तुमच्या शव्दांत लिहा.

४) अहवालाची आवश्यकता स्पष्ट करा.

आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा. १०

१) खालील मुद्दयांच्या आधारे अहवाल लेखनाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

वस्तुनिष्ठता आणि सुस्पष्टता ........... शव्दमर्यादा ........... निःपक्षपातीपणा

२) मुलाखत कशी घ्यावी? हे खालील मुद्दयांच्या आधारे थोडक्यात स्पष्ट करा.

मुलाखतीचा प्रारंभ ......... मुलाखतीचा मध्य ......... मुलाखतीचा समारोप

३) खालील मुद्दयांच्या आधारे माहितीपत्रकाच्या रचनेची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

माहितीला प्राधान्य ........... उपयुक्तता ........... आकर्षक मांडणी ........... भाषाशैली

४) खालील मुद्दयांच्या आधारे मुलाखतीचे हेतू स्पष्ट करा.

मुलाखत दात्याच्या व्यक्तित्वाचे विविध पैलू समजून घेणे ......... व्यक्तीच्या जीवनातील संघर्ष जाणून घेणे...... विचारवंतांची विविध विषयावरील मते ...... प्रवोधन ...... जनजागृती.

Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE. Contact us: @SahajAdhyayan

8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi

This Question paper shared by Pratik Patil from Kolhapur District. Thanks Pratik.

Free Practice Question Papers for 10th, 11th, 12th, MHT-CET, NEET, JEE.    Contact us: @SahajAdhyayan



# विभाग ५ - व्याकरण व लेखन

(व्याकरण घटक व वाक्पप्रचार)

कृती ५ अ) सूचनेनुसार कृती करा. १०

१) य) खालील वाक्य वाक्यांच्या आशयानुसार कोणत्या प्रकारात मोडते, ते लिहा. ०१

गोठ्यातील गाय हंबरते

र) कंसातील सूचनेप्रमाणे वाक्य रूपांतर करा. ०१

पांढरा रंग सर्वांना आवडतो (प्रश्नार्थी वाक्य करा)

२) सूचनेनुसार कृती करा.

य) खालील वाक्यातील सामासिक शब्द ओळखून लिहा. ०१

पतिपत्नी ही संसाररथाची दोन महत्वाची चाके आहेत.

र) खालील चौकट पूर्ण करा. ०१

| समासाचा विग्रह | सामासिक शब्द |
|---|---|
| राजाची आज्ञा | |

३) सूचनेनुसार कृती करा.

य) खालील वाक्यातील प्रयोग ओळखा ०१

शेतकऱ्याने फुलांची रोपे लावली.

र) भावे प्रयोग असलेले वाक्य ओळखा. ०१

१) आज लवकर सांजावले.

२) त्याने कपाटात पुस्तक ठेवले.

३) आम्ही अनेक किल्ले पाहिले.

४) समीर चित्र रंगवतो.

४) य) खालील काव्यपंक्तीतील अलंकार ओळखून लिहा. ०१

वीर मराठे आले गर्जत !
पर्वत सगळे झाले कंपित !

१) अर्थान्तरन्यास २) अनन्वय ३) अतिशयोक्ती ४) अपन्हुती

र) खालील काव्यपंक्तीतील उपमान ओळखा. ०१

न हे नयन, पाकळ्या उमलल्या सरोजातील.

५) य) 'आभाळाकडे डोळे लावणे' या वाक्पप्रचाराचा अर्थ सांगा. ०१

१) आतुरतेने वाट पहाणे २) आभाळाकडे पहाणे ३) डोळे भरून पहाणे ४) खूप वेळ होणे

र) 'आभाळाकडे डोळे लावणं' या वाक्पप्रचाराचा वाक्यात उपयोग करा. ०१

आ) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे २०० ते २५० शब्दांत निबंध लिहा. १०

१) डोंगर माथ्यावरील एक गाव.

२) आमच्या कॉलनीतील भाजी विक्रेता

३) कोरोनाग्रस्त व्यक्तिचे मनोगत

४) स्त्री-कुटुंबव्यवस्थेचा कणा.

५) आरसा नसता तर.

8552892890 save our number as *Sahaj Adhyayan* ... & message us on WhatsApp... Hi